राज्य सागर तटीय व्यवस्थापन
प्राधिकरण स्थापन करण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन
## पर्यावरण विभाग

शासन निर्णय,क्रमांक : सातप्र ३४९९/२०/प्र.क्र.७/९९/का-१
मंत्रालय, १५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २४ जून,१९९९

वाचा: १) केन्द्र शासनाची अधिसूचना क्रमांक एसओ-१००३/ई. दिनांक २६.११.१९९८

**शासन निर्णय :-** केन्द्र शासनाच्या पर्यावरण विभागाने तटीय परिमंडळ व्यवस्थापन अधिसूचनेअंतर्गत प्रत्येक राज्याला तटीय परिमंडळ व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे आदेश दिले होते. या आदेशान्वये राज्य सरकारने तटीय परिमंडळ व्यवस्थापन आराखडा तयार करुन केन्द्र शासनाला सादर केला होता. तटीय परिमंडळ व्यवस्थापन अधिसूचनेची व त्या अंतर्गत तयार केलेला तटीय परिमंडळ व्यवस्थापन आराखडयाची योग्य त-हेने अंमलबजावणी करण्यासाठी केन्द्र शासनाच्या पर्यावरण विभागाने पर्यावरण संरक्षण कायदा कलम ३ अंतर्गत अधिसूचना क्रमांक एसओ-१००३(ई), दिनांक २६.११.१९९८ रोजी पारित केली.

२. सदर अधिसूचनेनुसार सचिव (पर्यावरण) हे या तटीय परिमंडळ व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष असतील व प्राधिकरणामध्ये सचिव (महसूल व वने), सचिव (नगर विकास), हे शासकीय अधिकारी सदस्य म्हणून आहेत. याशिवाय डॉ.लिला भोसले, डॉ.ए.डी.दिवान व डॉ.आर.पी.गुप्ता हे अशासकीय सदस्य आहेत. या प्राधिकरणाचे सदस्य सचिव हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव आहेत, केन्द्र शासनाने अधिसूचनेत निर्गमित केल्याप्रमाणे या प्राधिकरणाची कार्यकक्षा असेल.

३. समितीच्या बैठकीस उपस्थित राहणा-या शासकीय सदस्यांना मुंबई नागरी सेवा नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता मंजूर करण्यात यावा. अशासकीय सदस्यांना प्रवासभत्ता व दैनिकभत्ता, मुंबई नागरी सेवानियम खंड १ मधील परिशिष्ट ४२(अ) मधील सेक्शन १ मधील १(१)(बी) च्या तरतूदीनुसार व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-टीआरए-१४७७/१०३२/ सी/एसईआर-५, दिनांक २३.९.१९७७ व क्रमांक- टीआर-१०८३/१४२६/ एसईआर-५, दिनांक १.२.१९८४ च्या आधारे नियमित केला जावा. या नियमांच्या तरतूदी केवळ रेल्वे / सडक प्रवासासाठी लागू असल्यामुळे अशासकीय सदस्यांना विमान प्रवास तसेच रेल्वेचा वातानुकूलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही व वैयक्तिक वाहन वापरण्यास परवानगी असणार नाही.

४. उपरोक्त बाबींवर होणारा खर्च मागणी क्रमांक : यु-३ २२५१-सेक्रेटरिएट सोशियल सर्व्हिसेस - इतर सामाजिक सेवा ०९० सेक्रेटरीएट (ए) पर्यावरण विभाग (२२५१०२६७) लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो दरवर्षीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्र.क्र.४५५/९९/व्यय-१६, दिनांक १६.६.१९९९ ला अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुरेन्द्र जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,